MHSN090013032023

## निशाणी क्र. ०८ खालील आदेश

प्रस्तुत अर्ज जाबदार यांनी मुळ अर्जास म्हणणे दाखल करण्यास झालेला उशीर माफ होवुन मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्ज व त्यावरील जबाबाचे अवलोकन केले. दोन्ही बाजूच्या वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

३. जाबदाराचे थोडक्यात कथन असे आहे की, जाबदार हे सदर प्रकरणात हजर झाले आहेत. परंतु, जाबदार हे मजूरीचे काम करत असल्यामुळे त्यांना कामासाठी वेगवेगळ्या ठिकाणी जावे लागत होते. जाबदार यांना कायद्याच्या अज्ञानपणामुळे वकीलांना भेटून माहिती व कागदपत्रे वेळेत देता आली नाही. त्यामुळे त्याला मुदतीत म्हणणे दाखल करता आले नाही. जाबदाराने जाणून–बुजून म्हणणे देण्यास विलंब केलेला नाही. सदर अर्जाचा गुणदोषावर न्यायनिर्णय होण्याकरीता झालेला विलंब माफ करावा व जाबदाराचे म्हणणे दाखल करुन घ्यावे याकरीता त्यांनी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

**४.** सदर अर्जावर अर्जदारातर्फे वकीलांनी निशाणी क्र.१० अन्वये म्हणणे दाखल करून असे कथन केले आहे की, जाबदाराने केवळ विलंब करण्याचया उद्देशाने म्हणणे दाखल केलेले नाही. त्यामुळे त्यांनी जाबदार यांना जास्तीत जास्त दंड करण्याची व अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

**५.** उभय पक्षकारांच्या वतीने करण्यात आलेली परस्परविरोधी कथने विचारात घेऊन अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसते की, प्रस्तुतचा मूळ अर्ज अर्जदाराने कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण या कायद्याअंतर्गत दाखल केलेला आहे. अर्जाचा निकाल गुणदोषावर होण्यासाठी जाबदारला त्याची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक ठरते. जाबदाराने अर्जात नमूद केलेले कारण हे प्रथमदर्शनी संयुक्तिक दिसते. यास्तव नैसर्गिक न्यायतत्वाचा विचार करता व अर्जात पुढील वारंवारीता टाळण्याकरीता जाबदारांविरुद्ध झालेला 'म्हणणे नाही' हा आदेश रद्द करुन त्यांना सदर अर्जावर म्हणणे दाखल करण्याची मुभा देणे न्यायोचित होईल. सदर अर्ज मंजूर केल्यास अर्जदाराचे कोणेही नुकसान होणार नाही असे प्रथमदर्शनी दिसते. यास्तव योग्य तो खर्चाचा आदेश पारीत करुन सदरचा अर्ज मजूंर करणे उचित ठरते. त्याबाबत मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. सदरचा नि.क्र. १३ चा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. जाबदारांविरुद्ध झालेला 'म्हणणे नाही' हा आदेश रक्कम रुपये ५००/- (अक्षरी पाचशे रुपये मात्र) च्या खर्चासह रद्द करण्यात येत आहे.

३. खर्चाची रक्कम जाबदारांनी अर्जदारास आज अगर पूढील तारखेपर्यंत द्यावी.

SATISH YASHWANT WAKCHAURE
Digitally signed by SATISH YASHWANT WAKCHAURE
Date: 2026.07.14 17:51:33 +0530

दिनांकः १४.०७.२०२६

( एस.वाय. वाकचौरे )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, तासगांव.